दिनांक : २१.०४.२०२६.

नि.फौ.ख.क्र. १०४/२०२३
सरकार ..वि.. प्रमोद चक्रे +१
निशाणी क्रमांक १९

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची जबानी** –

**मी शपथेवर सांगतो की,**

**नाव** :– **चंदु वामन कुंजेकर** (जप्ती पंच)

**वय** :– ४३ वर्षे,

**व्यवसाय** :– मजुरी,

**राहणार** :– शेंदोळा खुर्द, ता. तिवसा, जि. अमरावती.

.................................................................................................

**सरकार तर्फे सहायक सरकारी विधीज्ञ कु. एल.टी. गेडाम यांचे मार्फत शपथेवर सुरु :-**

मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक २२.०७.२०२३ रोजी पोलीसांनी मला कोठेही बोलविले नव्हते. माझ्या समक्ष कोणताही जप्ती पंचनाम्याची कार्यवाही केली नव्हती. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे परंतु त्यातील मजकुर मला माहीत नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहायक सरकारी विधीज्ञ यांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १५४ नुसार परवानगी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२.०७.२०२३ रोजी दुपारी १:१० वाजताच्या दरम्यान पोलीस स्टेशन, तिवसा येथे पंच म्हणुन पंचनामा करण्याकरीता बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी दुसरा पंच जितेंद्र मरधाने हे माझ्यासोबत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपी क्रमांक १ च्या ताब्यातुन एक पिवळया रंगाची बांबुची काठी जप्त केली होती. म्हणणे खरे नाही की,

पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचुन दाखविला व त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास – संपला.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. पी. गाडे यांचे मार्फत :- नाकारला.**
**उलटतपास – संपला.**
**फेरतपास काही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

स्वा/–
**(रोहीणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती

**समक्ष**

स्वा/–
**(रोहीणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती